देशदूत यूट्युब चॅनलसाठी क्यूआर कोड स्कॅन करा
YouTube
www.deshdoot.com

शिल्पकार विकासाचा...
# देशदूत

Classifieds
जाहिरात करण्याचा
किफायतशीर मार्ग

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५६ । अंक ३४८ । सोमवार, दि. २५ ऑगस्ट २०२५ । पाने १२ | किंमत ₹ ५

## आतील पानात

**संपादकीय**
राजकीय इच्छाशक्तीत अडचण काय?

**स्मरण**
बॉस माणूस

**आजकाल**
उत्सवाआधीच आलेले हे विघ्न टळो!

## ‘गगनयान’ मोहीम : ‘इस्रो’ची एअर ड्रॉप चाचणी यशस्वी

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या (इस्रो) ‘गगनयान’ मोहिमेला रविवारी मोठे यश लाभले. या मोहिमेसाठी पॅरॅशूट यंत्रणेची पहिली इंटिग्रेटेड एअर ड्रॉप टेस्ट (आयएडीटी) यशस्वी झाली.

भविष्यात अंतराळयात्री सुरक्षितपणे पृथ्वीवर परतावेत, हा या चाचणीचा उद्देश होता, असे ‘इस्रो’कडून सांगण्यात आले. भारतीय वायूसेना, डीआरडीओ, भारतीय नौसेना आणि तटरक्षक दलाच्या सहकार्यातून ‘इस्रो’ने ही चाचणी यशस्वी केली. ‘इस्रो’ने ‘एक्स’ समाज माध्यमावर या चाचणीची माहिती दिली आहे.



‘गगनयान’ मोहिमेसाठी पॅराशूट आधारित यंत्रणेची पहिली इंटिग्रेटेड एअर ड्रॉप चाचणी यशस्वी झाली. अनेक संस्थांच्या संयुक्त प्रयत्नांतून लाभलेले हे यश आहे. भारताची पहिली मानवरहित ‘गगनयान’ मोहीम डिसेंबरमध्ये सुरू होणार आहे. त्यात अर्धमानव रोबोट व्योममित्रालादेखील पाठवण्यात येईल, असे ‘इस्रो’चे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी सांगितले. आतापर्यंत ‘गगनयान’ योजनेच्या सुमारे ८० टक्के म्हणजे जवळपास ७,७०० चाचण्या पूर्ण झाल्या आहेत. आणखी २,३०० चाचण्या मार्चअखेर पूर्ण करण्यात येतील, असेही नारायणन यांनी नमूद केले.

याआधी केंद्रीय विज्ञान तथा तंत्रज्ञान राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनीही ‘गगनयान’ मोहिमेची माहिती दिली होती. ‘गगनयान’साठी नवे ह्यूमन रेटेड लाँच व्हेईकल तयार करण्यात आले आहे. त्याची क्षेत्र चाचणीही यशस्वी झाली आहे, असे सिंह यांनी सांगितले होते.



# मतचोरी होऊ देणार नाही

## राहुल गांधी यांचे निवडणूक आयोग, भाजपवर टीकास्त्र

**पूर्णिया । वृत्तसंस्था**

सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांचे खासगीकरण केल्यानंतर मोदी सरकार आता निवडणूक आयोगाच्या मदतीने ‘एसआयआर’च्या मार्गाने गरिबांची मते चोरू पाहत आहे. आम्ही असे होऊ देणार नाही, असा इशारा देत काँग्रेस नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकार, निवडणूक आयोग आणि भाजपवर टीकास्त्र सोडले.



इंडिया आघाडीची ‘वोटर अधिकार यात्रा’ रविवारी पूर्णिया येथे पोहोचली. त्यावेळी झालेल्या सभेला राहुल गांधी यांनी संबोधित केले. त्यावेळी देशातील गरीब आणि युवकांसाठी रोजगाराचे सर्व मार्ग आणि संधी भाजपप्रणित केंद्र सरकारने बंद केले आहेत, असा आरोप राहुल यांनी लगावला. संविधान देशातील प्रत्येक नागरकाला समान अधिकार देते. ‘एसआयआर’च्या मार्ग वापरून गरिबांची मते चोरण्याचा प्रयत्न आम्ही हाणून पाडू. बिहारची जनता येत्या विधानसभा निवडणुकीत भाजप आणि त्याच्या घटक पक्षांना कठोर उत्तर देईल, असा इशाराही राहुल गांधी यांनी दिला.

निवडणूक आयोगाची भूमिका स्पष्टपणे दिसायला हवी. मी कर्नाटकात आयोगासमोर एक डेटा ठेवला, पण त्यापैकी एकाही प्रश्नाचे उत्तर आजपर्यंत मिळालेले नाही. एक लाख खोटे मतदार कोठून आले? कोण होते? याचे उत्तर निवडणूक आयोगाने दिलेले नाही. माझी पत्रकार परिषद घेत असताना, राहुल गांधी पान ८ वर

### आम्ही सारे एक साथ

राजद नेते तेजस्वी यादव यांच्यासोबत ‘वोटर अधिकार यात्रा’ काढण्याबाबत राहुल गांधी म्हणाले, आमच्यात एक चांगली भागीदार बनली आहे. आम्ही सर्व पक्ष सोबत काम करीत आहोत. कोणताही तणाव नाही. आपसातील सन्मान आहे. वैचारिक रुपाने आम्ही एकजूट आहोत. राजकीय रुपानेही एकजूट आहोत. येत्या विधानसभा निवडणुकीतून आमच्या बाजूने खूप चांगला निकाल येतील, पण आम्हाला मतचोरी रोखायची आहे, असे राहुल गांधी म्हणाले.

### राहुल यांच्या सुरक्षेत चूक

‘वोटर अधिकार यात्रे’च्या आठव्या दिवशी काल पूर्णियात राहुल गांधी यांनी बुलेट चालवली. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष राजेश राम त्यांच्या पाठीमागे बसले होते. राहुल यांनी २ किमी बुलेट सवारी केली. यादरम्यान अचानक राहुल यांचा एक समर्थक समोर आला आणि काही समजण्याआधीच त्याने राहुल यांचे चुंबन घेतले. सुरक्षारक्षकांनी त्या तरुणाला फटका देऊन बाजूला केले. तेजस्वी यादव दुसऱ्या बुलेटवर दिसले.

## ‘गगनयात्री’ राष्ट्रीय आकांक्षेचे प्रतीक : सिंह

### शुक्ला, नायर, कृष्णन, प्रताप यांचा गौरव



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या (इस्रो) ‘गगनयान’ या पहिल्या अंतराळ उड्डाण मोहिमेचा भाग असलेले ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला, ग्रुप कॅप्टन पी.बी. नायर, ग्रुप कॅप्टन अजित कृष्णन आणि ग्रुप कॅप्टन अंगद प्रताप यांचा रविवारी येथे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. ‘देशाचे रत्न’ आणि ‘राष्ट्रीय आकांक्षांचे प्रवर्तक’ अशा शब्दांत संरक्षणमंत्र्यांनी चौघा ‘गगनयात्रीं’चा गौरव केला. अंतराळ क्षेत्रातील भारताचे वाढते अस्तित्व सिंह यांनी अधोरेखित केले. आम्ही पान ८ वर

### शुभांशु शुक्ला यांचे अभिनंदन

यशस्वी अंतराळ मोहिमेबद्दल ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी अभिनंदन केले. त्यांचा दृढनिश्चय व धैर्याचेही कौतुक केले. हे धैर्य भारताच्या आत्म्याचे प्रतीक असून ते संपूर्ण राष्ट्रासाठी अभिमानाचा स्रोत आहे, असे ते म्हणाले.

## निवडक

### राज ठाकरे यांचे उद्धव यांना निमंत्रण

**मुंबई ।** मुंबई महापालिकेची निवडणूक तोंडावर येऊन ठेपली आहे. येत्या महापालिका निवडणुकीत मनसे आणि ठाकरे गटाची युती होईल अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. काल मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना फोन केल्याने चर्चांना उधाण आले आहे. राज यांनी गणेशोत्सवाचे निमंत्रण देण्यासाठी उद्धव ठाकरे यांना फोन केल्याची माहिती आहे. उद्धव यांना सहकुटुंब दादरमधील ‘कृष्णकुंज’ या निवासस्थानी गणपती दर्शनासाठी यावे, असे निमंत्रण राज यांनी दिले आहे. उद्धव यांनी निमंत्रण स्वीकारल्याची माहिती मिळत आहे. उद्धव ठाकरे २७ ऑगस्टला सहकुटुंब राज यांच्या घरी जाणार असल्याचे समजते.

### पुजाराची निवृत्ती

**नवी दिल्ली ।** भारतीय क्रिकेट संघाचा स्टार खेळाडू चेतेश्वर पुजाराने क्रिकेटच्या सर्व फॉरमॅटमधून संन्यास घेतला आहे. सोशल मीडियावर पोस्ट लिहून पुजाराने ही माहिती दिली आहे. ‘इन्स्टाग्राम’वर ३७ वर्षीय पुजाराने मोठी पोस्ट लिहून आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. पुजाराने भारतासाठी १०० हून अधिक कसोटी सामने खेळले आहेत.

(सविस्तर वृत्त शेवटच्या पानावर)

### युतीच्या आशा धूसर

**मुंबई ।** एखादा नेता मला भेटला, यावरुन राजकारण होत नसते, असे वक्तव्य करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज ठाकरे महायुतीसोबत राहतील, याबाबतच्या उरल्यासुरल्या आशा संपवून टाकल्या आहेत. दोन दिवसांपूर्वीच राज यांनी ‘वर्षा’ बंगल्यावर फडणवीस यांची भेट घेतली होती. भेट झाली म्हणून राजकीय समीकरणे बदलत नाहीत, असे फडणवीस म्हणाले.

## सोने-चांदी

| सोने (प्रति १० ग्रॅम) | |
|---|---|
| २४ कॅरेट | १,००,५०० |
| २२ कॅरेट | ९२,४६० |
| चांदी (प्रतिकिलो) | १,१७,५०० |

## तापमान

किमान : २१.३°
कमाल : २६.९°

## मिश्किली
धनंजय एकबोटे




पुरे झाला क्रिकेटला विरोध! आता ‘टाळ्या’ वाजवून स्वागत करा.

## मतचोरीचे आरोप नकोत, पुरावे द्या!

### प्रवीण दरेकर यांचा राज ठाकरेंवर निशाणा

**नाशिक । प्रतिनिधी**

येत्या काळात महापालिकेच्या निवडणुका होणार आहेत. मात्र, उद्याचा पराभव दिसत असल्याने विरोधक मतचोरीचे आरोप करीत आहेत. राज ठाकरेंकडे काही पुरावे असतील तर त्यांनी निवडणूक आयोगाला द्यावेत. त्यांनी केलेले आरोप तोंडी चालत नसतात, असे म्हणत माजी विरोधी पक्षनेते व मनसेतून भाजपत गेलेले नेते प्रवीण दरेकर यांनी राज ठाकरे यांच्यावर निशाणा साधला.

सहकारी पतसंस्थांच्या कार्यशाळा उद्घाटनासाठी दरेकर रविवारी नाशिकला आले होते. त्यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. काही प्रश्न मुद्दाम पुढे आणले जात आहेत, असे म्हणत राज ठाकरे यांच्यावर निशाणा साधला.

पुण्यात पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात राज ठाकरे यांनी मनसे उमेदवारांना मते मिळतात. मात्र ती मते लाटली जातात. मतचोरी झाली आहे, असा आरोप केला होता. त्यावर प्रवीण दरेकर यांनी मतप्रदर्शन केले. राज ठाकरे यांनी केलेले आरोप असे तोंडी चालत नसतात. राज ठाकरेंकडे काही ठोस पुरावे असतील तर त्यांनी निवडणूक आयोगाला द्यावेत. निवडणूक हरल्यानंतर अशी कारणे ते देत आहेत. येत्या काळात महापालिका निवडणुका आहेत. केंद्र आणि राज्य सरकार विकासावर पान ८ वर

## मुंबईत आंदोलन; जरांगेंची घोषणा

**बीड । वृत्तसंस्था**

मराठा समाजाला ओबीसींना आरक्षण मिळण्यासाठी आंदोलनाचे नेते मनोज जरांगे येत्या २७ ऑगस्टला मुंबईकडे रवाना होणार आहेत. २९ ऑगस्टला आझाद मैदानावर त्यांचे आंदोलन होणार आहे. आंदोलनाची दिशा ठरवण्यासाठी मांजरसुंबा येथे बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत जरांगे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. आरक्षण मिळाल्याशिवाय मुंबई सोडायची नाही, ही खूणगाठ बांधण्याचे आवाहन त्यांनी केले.

## जिल्ह्यात उद्यापासून अधिक पाऊस?

**नाशिक । प्रतिनिधी**

राज्यात ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात मोसमी पाऊस पुन्हा सक्रिय होणार आहे. सह्याद्रीच्या घाटमाथ्यावरील नाशिक, पुणे, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यांत अधिक प्रमाणात पाऊस होण्याची शक्यता ज्येष्ठ हवामानतज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी वर्तवली आहे.

मंगळवार (दि.२६) ते शुक्रवार (दि.२९) या चार दिवसांच्या कालावधीत संपूर्ण महाराष्ट्रात मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. हा पाऊस ‘मघा’ नक्षत्रातील दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यातील संथ गतीचा असेल. विशेषतः कोकणातील रायगड, मुंबई, ठाणे, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, खान्देश, छत्रपती संभाजीनगर, जालना, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, संपूर्ण विदर्भ तसेच सह्याद्रीच्या घाटमाथ्यावरील नाशिक, पुणे, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यांत अधिक प्रमाणात पडण्याची शक्यता आहे. सह्याद्रीच्या कुशीतील या भागांत सातत्यपूर्ण पावसामुळे धरणे, नद्या आणि कालवे यापूर्वीच ओसंडून वाहत आहेत. येत्या काळातही पुराचे पाणी आणि विसर्गाचा स्तर कायम राहण्याची शक्यता आहे.

ईशान्य मध्य प्रदेशावर समुद्रसपाटीपासून ७.६ किमी उंचीपर्यंत कमी दाबाचे क्षेत्र तयार होऊन, त्याचे वायव्य दिशेकडे मार्गक्रमण होण्याची शक्यता आहे. देशाच्या मध्य भागातून दक्षिणेकडे सरकणारा कमी दाबाचा पूर्व-पश्चिम मान्सूनचा आस यामुळे पावसाला पोषक वातावरण पान ८ वर

# गणेशोत्सवासाठी चार हजार पोलिसांचा फौजफाटा तैनात

## आयुक्तालयाचे नियोजन पूर्ण; डीजेसह लेझर लाईटवर यंदाही निर्बंध कायम

**नाशिक । प्रतिनिधी**

अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपलेल्या शहरातील गणेशोत्सवाच्या पोलीस बंदोबस्ताचे नियोजन पोलीस आयुक्तालयाने पूर्ण केले आहे. सर्वच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे गणरायाच्या आगमनाच्या पूर्वतयारीत व्यस्त आहेत. शहर पोलिसही हा उत्सव निर्विघ्न पार पाडण्यासाठी सज्ज झाले आहेत. गणेशोत्सव काळात शहरात तब्बल ४ हजार पोलीस अधिकारी व अंमलदारांचा फौजफाटा तैनात असेल. संवेदनशील ठिकाणी अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला जाईल. गणेशोत्सवासह विसर्जन मिरवणुकीत डीजेसह प्रखर ‘लेझर’ लाईटवर यंदाही निर्बंध कायम असणार आहेत.



मागील वर्षी गणेशोत्सव मिरवणुकीत सहभागी मंडळांनी अटी व शर्तींच्या परवानगींचे उल्लंघन करत डीजेचा दणदणाट केला होता. यंदा मात्र, सर्वच गणेश मंडळांना मार्गदर्शक व कायदेशिर नियमांचे पालन करावे लागणार आहे. कारण, पोलिसांचेही यंदाच्या उत्सवातील कार्यवाहीसह कारवाईचे नियोजन अंतिम टप्प्यात आले आहे. त्यानुसार बंदोबस्ताचे नियोजन व वाटप करण्यात आले आहे. विविध ठिकाणी नाकाबंदी करुन तपासणी केली जाणार आहे. तसेच काही फिक्स पॉईंट नेमले जाणार आहेत. गणेशोत्सवाची लगबग, गर्दी लक्षात घेता यादिवशी पोलीस बंदोबस्तासह वाहतूक मार्गांत आवश्यक बदल केले जाणार आहेत. पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, गुन्हेशाखेचे उपायुक्त किरणकुमार चव्हाण, बच्छाव, झोन एकच्या उपायुक्त मोनिका राऊत चव्हाण, मुख्यालय आणि वाहतूक शाखेचे उपायुक्त चंद्रकांत खांडवी, झोन दोनचे उपायुक्त किशोर काळे यांच्या सूचनांनुसार पोलीस ठाणेनिहाय आणि परिमंडळनिहाय सशस्त्र बंदोबस्त तैनात असेल. यात गुन्हेशाखा, अकार्यकारी शाखा, वाहतूक, विशेष शाखा, बीडीएस, गोपनीय शाखेचे अधिकारी व अंमलदार कार्यरत असतील. अनेक भागांत साध्या वेशातील पोलीस कर्तव्य बाजवतील.

### प्रमुख मुद्दे

- नियमांचे पालन न केल्यास पोलिसच गुन्हे नोंदवणार.
- पोलीस ठाणेनिहाय गणेशोत्सव मंडळांची यादी तयार.
- विशेष शाखेमार्फतही यापूर्वी गुन्हे नोंद असलेल्या मंडळांना समज.
- कोणत्याही मंडळाला डीजे लावण्यास निर्बंध

### असा असेल बंदोबस्त

पोलीस उपायुक्त-४, सहायक आयुक्त-८, पोलीस निरीक्षक-५०, एमपीएतील प्रशिक्षणार्थी अधिकारी-३०, रेल्वे पोलीस फोर्सचे अधिकारी-३०, एपीआय, पीएसआय, ग्रेड पीएसआय-३००, पोलीसांचे मनुष्यबळ-३०००, एसआरपीएफ कंपनी-१, आरसीपी-१, रॅपिड ॲक्शन फोर्स-१, महिला व पुरुष होमगार्ड-१२००

नाशिक ■ नाशिक ■ जळगाव ■ धुळे ■ नंदुरबार ■ अहमदनगर येथून एकाच वेळी स्वतंत्रपणे प्रकाशित

www.facebook.com/deshdoot